epaper.सामना.com साठी येथे क्लिक करावे. epaper.saamana.com

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
ISO 9001:2000
संपादक : बाळ ठाकरे



Stocks After 2nd Quarter Results
Ads by Guruji



सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

## काळभैरव



आपण जगत आहोत तो काळ, गेलेला मागील काळ आणि येणारा काळ अशी काळाचीसुद्धा एक सत्ता असते. भूत, वर्तमान आणि भविष्य या तीन काळांबरोबरच ज्याला तिन्हीत्रिकाळ म्हणतात अशा सकाळ, मध्यान्हकाळ आणि संध्याकाळ यासह हा काळ सर्व जीवनात सबंध विश्वाला पुरून उरलेला असतो. याच्यावर कोणीही मात करू शकत नाही. म्हणूनच त्याचे माहात्म्य ओळखून त्याच्या उपासनेसाठी आपल्या संस्कृतीने भैरवाचे म्हणजेच शिवाचे एक रूप असलेले स्वतंत्र दैवतच सांगितले आहे ते म्हणजे काळभैरव!

हिंदुस्थानात अनेक ठिकाणी गावाच्या वेशीलगत काळभैरवाचे मंदिर असते. कोकणात काळभैरवाला रवळनाथ असंही म्हणतात. काशीलासुद्धा काशीविश्वेश्वराचे दर्शन घेण्याआधी प्रथम काशीक्षेत्राच्या सीमेलगत असणाऱ्या काळभैरवाचे दर्शन घ्यावे लागते एवढे याचे सामर्थ्य असते. या दैवताचे स्तुतिपूजन करणारी 'काळभैरवाष्टकम्' नावाची अनुपम सुंदर स्तोत्ररचना श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी केली आहे. शंकराप्रमाणेच नीलकंठ असणारे हे दैवत 'अक्षर' म्हणजेच कधीही नष्ट न होणारे असून सदैव नीतिमार्गावर चालणारे आणि चालायला लावणारे आहे असे त्याचे वर्णन आचार्यांनी केले आहे. ना अंत ना पार असा तो असल्याने तो दिगंबर आहे, म्हणजेच दिशा हेच त्याचे वस्त्र आहे. थोडक्यात म्हणजे संपूर्ण विश्वाला व स्वर्गलोकांसहित सर्व लोकांना व्यापणारी ही काळनामक व्यापक शक्ती आहे.

काळभैरव हा वस्तुत: शंकराचा प्रमुख गण. मुळामध्ये असुर प्रवृत्तीचा असलेल्या या काळभैरवाला शंकराने वरदान देऊन सुर प्रवृत्तीचा बनविला व चोराची पावले चोरच ओळखतो या न्यायाने त्याच्याकडे आसुरी शक्तींच्या नियंत्रणाचं कार्य सोपविलं अशी पौराणिक कथा आहे.

सध्या या दैवताची ज्याप्रमाणे आराधना केली जाते ती अतिशय संकुचित आहे. फक्त भूतप्रेतादी बाधा काढणारे अथवा त्यापासून रक्षण करणारे इतके संकुचित आणि मर्यादित सामर्थ्य काळभैरवाचे नाही. उद्या कार्तिक कृष्ण सप्तमीला काळभैरव जयंती आहे. काळ हासुद्धा वैश्विक शक्तीचेच एक रूप असल्याने या दिवशी त्याचा नियंता असलेल्या काळभैरवाला ज्ञानपूर्वक नमन घडावे म्हणून या दैवताचे व्यापकत्व प्रथम समजावून घेणे आवश्यक आहे.

काळभैरवाचे अधिपत्य हे साक्षात काळावर असते. त्याच्याच सत्तेने काळाच्या माध्यमातून संपूर्ण सृष्टी ही उत्पत्ती, स्थिती व लय या परिवर्तनातून जात असते. परिवर्तन हा विश्वाचा नियमच आहे. आज आहे असे भासणारे सुख उद्या टिकेलच असे नाही तर आज डाचणारे दु:ख उद्या राहीलच असेही नाही. सुख-दु:खाच्या या येण्या-जाण्याचा क्रम हासुद्धा काळ ठरवत असतो. वर्तमानकाळातील प्रत्येक क्षणावर काळाचा प्रभाव असतो व या प्रभावापुढे इतर सर्व गोष्टी निष्प्रभ ठरतात. याचे वर्णन तुकाराम महाराजांनी एका अभंगात अचूक शब्दांत केले आहे-

काळाची ही उडी पडेल बा जेव्हा। सोडविना तेव्हा मायबाप।।
सोडविना बंधू पाठीची बहीण। शेजेची कामीण दूर राहे।।
सोडविना राजा देसीचा चौधरी। आणिक सोयरी भली भली।।

जसे बी पेरल्यावर त्याचा वृक्ष होण्यामागे काळाचा प्रभाव असतो, त्याचप्रमाणे जीवनात बसणारे प्रारब्धाचे फटकेसुद्धा काळाच्या प्रभावाखालीच येतात. प्रारब्धाचे भोग ज्याचे त्यालाच भोगावे लागतात. कोणताही नातेवाईक, आप्त-स्वकीय काळगतीतून मनुष्याला सोडवू शकत नाही. राम-कृष्णादी दैवी अवतारांनासुद्धा काळगतीनुसार प्राप्त होणाऱ्या सुख-दु:खांना सामोरं जावं लागलं. म्हणूनच प्रारब्धाचे भोग भोगायला लावणारा कठोर शासनकर्ता अशी काळभैरवाची ओळख सांगितली जाते. उत्तर हिंदुस्थानात काळभैरवाला कोतवाल म्हणतात ते यामुळेच.

जीवनातही जन्म, वृद्धी, परिवर्तन, क्षय, नाश. इ. रूपांनी हा काळ आपल्याला ग्रासत असतो. आपला आलेला सद्यजन्म हासुद्धा एक प्रकारे काळाने आपल्यावर मिळवलेला विजय असतो. जन्म आला याचाच अर्थ आपण काळावर विजय मिळवू शकलेलो नाही.

असे असले तरी काळालासुद्धा कर्माच्या नियमांची मर्यादा असते. कर्मफळांच्या नियमांबाहेर काळ कोणाचंही काहीही वाकडं करू शकत नाही. कारण या नियमांना तो बांधील आहे. जीवनात येणारी-जाणारी सुख-दु:खं ही जरी त्याच्या प्रभावाने आली तरी त्यामागे प्रेरणा ही आपल्याच पूर्वकर्मांची असते. म्हणूनच काळाला आपलंसं करण्यासाठी प्रथम आवश्यक ठरते ती वर्तमानकाळातील आपल्या कर्मामध्ये सुधारणा. कारण आजच्या वर्तमानाची काळाच्या अधिपत्याखाली जणू नोंदणी होत असते व तीच पुढे आपलं भविष्य बनून आपल्याला सामोरी येणार असते. म्हणूनच सत्कर्माच्या आधारे काळाचे सहाय्य आपल्यासाठी निर्माण करणे हे आपले प्रथम कर्तव्य ठरते.

वस्तुत: काळाच्या सत्तेची सीमा हीसुद्धा फक्त देहापर्यंतच असते. देहातील मूळ चैतन्याला काळ ग्रासू शकत नाही. कारण ते कालातीत आहे. त्यात परिवर्तन संभवत नाही हे ज्याला समजले त्याची या काळावर विजय मिळविण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्या दिशेने प्रयत्न करणाऱ्यालासुद्धा काळाचा कर्दनकाळ असलेला हा काळभैरव योग्य काळी योग्य कर्मफळ देऊन अंतिम ज्ञानप्राप्तीसाठी सहाय्य करतो हे ज्ञान जेव्हा होईल तेव्हा 'कालाय तस्मै नम:!' हे उद्गार विवशतेने न येता 'घडे भोगणे सर्व ही कर्मयोगे' याची प्रचीती आणून देणाऱ्या त्या वैश्विक शक्तीला मनापासून घडलेला तो नमस्कार असेल.

(श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर, खोपोली स्थानावर गुरुपदी विराजमान आहेत. संपर्क - bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी